**शपथेवर उलटतपास सुरु...**

**उलटतपास – विधिज्ञ श्री सोनेच्या तक्रारदारतर्फे**

८.     मी जाबदार कारखान्याकडे थकीत पगाराबाबत वेळोवेळी मागणी केलेबद्दल अर्ज केले होते त्यांच्या प्रती मी दाखल केलेल्या आहेत. त्या प्रती नि.क्र.यु–१३ व नि.क्र.यु–१६ सोबत दाखल केलेल्या आहेत. नि.क्र.यु–१३/१ वर दि.३०/०१/२०१६ रोजी साखर कामगार संघाने कारखान्यास दिलेले पत्र आहे. त्यावर अध्यक्ष व जनरल सेक्रेटरी यांची सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.यु–१७** दिला आहे. नि.क्र.यु–१३/२ कडे मी दि.२५/०३/२०१६ रोजी मी कारखान्याच्या एम.डी. कडे अर्ज दिला होता. त्यावर माझी सही असून सदर अर्जावर कारखान्याकडून पोहोच देण्यात आली आहे. त्यातील मजकूर बरोबर असून तो अर्ज **नि.क्र.यु–१८** कडे आहे. नि.क्र.यु–१३/३ कडे दि.३०/९/२०१६ रोजी सहा. कामगार आयुक्त कार्यालयाकडे केलेला अर्ज आहे. त्यावर माझी सही असून त्यावर सदर कार्यालयाची पोहोच आहे. त्यास **नि.क्र.यु–१९** दिला आहे. नि.क्र.यु–१३/४ वर मी अप्पर कामगार आयुक्त, पुणे यांचेकडे दि.१४/१०/२०१६ रोजी सादर केलेला अर्ज असून त्यावर इतर कामगारांसोबत माझी सही आहे. त्यावर सदर कार्यालयाची पोहोच आहे. त्यातील मजकूर बरोबर असून त्यास **नि.क्र.यु–२०** देण्यात आला. नि.क्र.यु–१३/५ कडे मी सांगलीचे आमदार यांचेकडे दिलेले पत्र आहे. त्यावर माझी सही असून मजकूर बरोबर आहे. त्यावर सदर कार्यालयाची पोहोच आहे. त्यास **नि.क्र.यु–२१** दिला आहे. नि.क्र.यु–१३/६ वर प्रादेशिक सहसंचालक, कोल्हापूर यांना दिलेले पत्र आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर सदर कार्यालयाची पोहोच आहे. तो **नि.क्र.यु–२२** कडे आहे.

९.     आता मला नि.क्र.यु–१६/१ वर दि.१९/९/२०१५ रोजी मी एम.डी. कडे दिलेला अर्ज आहे. त्यातील मजकूर बरोबर असून त्यावर माझी सही आहे. त्यावर

कारखान्याची पोहोच आहे. तो **<u>नि.क्र.यु–२३</u>** कडे आहे. नि.क्र.यु–१६/२ वर दि.२९/१/२०१६ रोजी परत मी एम.डी. कडे पत्र दिले असून त्यावर माझी सही असून मजकूर बरोबर आहे. त्यावर कारखान्याची पोहोच आहे. त्यास **<u>नि.क्र.यु–२४</u>** देण्यात आला. नि.क्र.यु–१६/३ वर एम.डी.कडे पगार मिळणेबाबत दि.२१/११/२०१६ रोजी अर्ज दिला आहे. त्यावर माझी सही असून त्यातील मजकूर बरोबर असून त्यावर कारखान्याची पाहोच आहे. तो **<u>नि.क्र.यु–२५</u>** कडे आहे. नि.क्र.यु–१६/४ वर सहा.कामगार आयुक्तांकडे थकीत पगारांबाबत अर्ज दिला आहे. त्यातील मजकूर बरोबर असून त्यावर माझी सही आहे. त्यावर कार्यालयाची पोहोच आहे. तो **<u>नि.क्र.यु–२६</u>** कडे आहे. नि.क्र.यु–१६/५ वर दि.२४/०२/२०१७ रोजी वकीलांमार्फत चेअरमन यांना पाठविलेली नोटीस आहे. त्यातील मजकूर मान्य असलेबाबत असून त्यावर माझी सही आहे. नोटीस रजिस्टर्ड पत्राने पाठविली आहे. ती नोटीस **<u>नि.क्र.यु–२७</u>** वर आहे. पत्र मिळाल्याची पोस्टाची रिसीट हजर केली आहे. ती **<u>नि.क्र.यु–२८</u>** वर आहे.

<u>सरतपास पूर्ण.</u>

<u>उलटतपास विधिज्ञ श्री मुतालिक यांच्या विनंतीवरुन तहकूब...</u>

Sd/–

सांगली. (दि.मा. पाटील)

सदस्य,

दिनांक – ०६/१०/२०२३. औद्योगिक न्यायालय, सांगली